आयुक्त राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई २३

## प रि प त्र क

विषय : मळीच्या पर राज्यातील निर्यातीस
आयुक्तांची पूर्व मान्यता घेण्याबाबत

क्र. मळी ११२००१/१२३१०/५-अ

मुंबई ३१ डिसेंबर २००१

या कार्यालयाच्या सम क्रमांकाच्या दिनांक ६.८.२००१ च्या पत्राव्दारे मळीच्या पर राज्यातील निर्यातीस आयुक्तांची पूर्व मान्यता घेण्याबाबत सूचन निर्गमित केल्या होत्या. मळीच्या निर्यातीवरील निर्णयाबाबत मंत्रीमंडळाच्या दिनांक २०.१२.२००१ च्या बैठकीत निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार सदर परिपत्रक निर्गमित करण्यापूर्वीची परिस्थिती पुनःस्थापित करावी असे शासनाने आदेशित केले आहे. सबब या कार्यालयाचे सम क्रमांकाचे दिनांक ६.८.२००१ चे परिपत्रक रद्द करण्यात येत आहे.

१. या पुढे जिल्हाधिकाऱ्यांनी मळी आयात करणाऱ्या घटकांकडून बॉम्बे मॉलेसीस रुल्स १९५५ चे नियम १४ व १५ प्रमाणे विहीत नमुन्यात अर्जप्राप्त झाल्यावर योग्य ती चौकशी करुन मळी निर्यातीची परवानगी देण्यात यावी. मध्यप्रदेश, गोवा व दमण या राज्यांना निर्यात केलेल्या मळी मद्यार्कापासून मद्यार्क व मद्य तयार करुन ते अवैध मार्गाने महाराष्ट्रात पाठविल्याच्या घटना या पूर्वी निदर्शनास आलेल्या आहेत. सदर प्रकाराची पुनरावृत्ती होवू नये व राज्याचे आर्थिक नुकसान होवू नये म्हणून मळी निर्यातीबाबत खालील प्रमाणे पध्दत विहीत करण्यात येत आहे. तसेच मळी निर्यातीमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जास्त फायदा व्हावा व महाराष्ट्रातील आसवनीचे नुकसान होवू नये या साठी मळी निर्यातीच्या अर्जाची योग्य ती चौकशी करुन परवानगी देण्याची गरज आहे.मळी निर्यातीपूर्वी खालील प्रमाणे कागदपत्रे प्राप्त करुन घ्यावीत व खालील चौकशी केल्यानंतरच मळी निर्यातीस परवानगी देण्यात यावी.

१) मळी निर्यातदारकडून विहीत नमुन्यात अर्ज प्राप्त करुन घ्यावा.

२) अर्जाबरोबर निर्यातीबाबत मळी विक्री कराराची प्रत त्यातील अटीसह प्राप्त करुन घ्यावी.

३) राज्यातील घटकांना पुरविण्यात आलेल्या व निर्यातदारास देण्यात येणाऱ्या मळीचे तुलनात्मक दर प्राप्त करावेत. (मळीतील TRS ची तुलना करुन )

४) जर महाराष्ट्रातील घटकाकडून प्राप्त झालेले आणि निर्यातीसाठी प्राप्त झालेले दर ( FOR SAME TRS ) या मध्ये जास्त तफावत आहे याची खात्री करुन घेण्यात यावी जेणे करून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा जास्ता फायदा होईल व कारखान्याचे नुकसान होणार नाही हे पाहून परवानगी देण्यात यावी. ( मळी निर्यातीचे दर केंद्रीय उत्पादन शुल्क वगळून कमीत कमी १० टक्के जास्तअसावेत)

५) आयातदाराने महाराष्ट्रामधून निर्यात केलेल्या मळीचा योग्य प्रकारे वापर करुन उत्पादित केलेले मद्य किवा मद्यार्क त्यांच्या राज्यामध्ये अधिकृतरित्या उत्पादन शुल्क भरुन विक्री केल्याबाबतचा पूरावा आयातदाराने सादर करावा. ( ही अट पहिल्या निर्यातीस लागू होणार नाही )

६) जर मागील कराराप्रमाणे आयातदाराने करारात नमुद केलेल्या दरा प्रमाणे पूर्ण मळीची उचल न केल्यास मळी निर्यातीची पुढील परवानगी नाकारण्यात यावा व अशी प्रकरणे आयुक्त राज्य उत्पादन शुल्क यांचे कार्यालयात पाठविण्यात यावीत.

७) परराज्यातून अवैधरित्या मद्याची आयात करताना या आधी जप्त केलेल्या मद्य उत्पादकाची नावे ( कमीत कमी दोन पेटया जप्त झाल्या असाव्यात ) महाराष्ट्र राज्य भरारी पथक यांच्या मार्फत सर्व अधीक्षकांना कळविण्यात येतील.तसेच अशा प्रकारची प्रकरणे अधीक्षकांनी नोंदविल्यास त्याबाबतची माहिती तात्काळ निरीक्षक भरारी पथक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविण्यात यावी. अशा घटकांची नावे काळया यादीत टाकून त्यांना मळी निर्यातीची परवानगी देण्यात येवू नये. आयादारांच्या आसवन्यामध्ये अवैध मार्गाने तयार झालेले मद्य किंवा मद्यार्क महाराष्ट्रात येणार नाही किंवा त्याची विक्री होणार नाही याची सर्वश्री जबाबदारी संबंधीत निर्यातदार घटकावर राहील. ही अट

आयुक्त कार्यालयात पाठविण्यात यावेत.

८) मद्यार्कांची निर्यात मात्र डिस्टीलरी असोशिएशन महाराष्ट्र यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन वरील अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यात यावी.

९) तूर्त उपरोक्त अटी मध्यप्रदेश , गोवा व दमण या राज्यांना लागू राहतील. इतर राज्यांना व भारताबाहेर मळी निर्यात करतांना नेहमी प्रमाणे चौकशी करुन परवानगी देण्यास हरकत नाही.

१०) पशु खाद्य निर्मिती करणाऱ्या घटकांना मळी निर्यातीची परवानगी आयुक्त कार्यालयामार्फत देण्यात येईल.

२. शासनाने असेही आदेश दिले आहेत की आयुक्त राज्य उत्पादन शुल्क यांनी मद्यार्क किंवा मद्य जे आयातदार अवैध रित्या महाराष्ट्र राज्यात विकतात त्यांचे काळया यादीत नाव समाविष्ठ करुन त्यांना मळी आयातीची परवानगी नाकारावी व त्याची यादी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पाठवावी. काळी यादी बनविण्याचे काम चालू आहे. या बाबतीत केलेल्या प्राथमिक चौकशी वरुन असे दिसून आले आहे की खाली नमुद केलेल्या आसवन्या / घटक यांचे व्यवहार संशयास्पद आहेत या बाबतीत पुढील चौकशी सुरु असून अंतिम यादी थोडयाच कालावधीत या कार्यालयातून कळविण्यात येईल. यादी तयार करतांना घटकाची क्षमता, त्यांनी तयार केलेले मद्य व मद्यार्क, स्थानिक क्षेत्रात केलेले विक्रीचे हिशोब , त्यांच्याकडे उपलब्ध असेलेले मळी वापराचे अभिलेख, घटकाच्या महाराष्ट्रामध्ये जप्त झालेल्या मद्याचा तपशिल. त्यांच्या विरुध्द महाराष्ट्रात व संबंधीत राज्यामध्ये केलेल्या कायदेशिर कारवाईचा तपशिल या आधारे काळी यादी तयार करण्यात येईल

३. उपरोक्त परिच्छेद क्रमांक २ प्रमाणे यादी तयार होईपर्यंत खालील घटकांना जिल्हाधिकारी स्तरावर मळी निर्यातीची परवानगी सध्या देऊ नये असे कळविण्यात येत आहे.

१) केडीया ग्रुप, मध्यप्रदेश

२) सोम ग्रुप मध्यप्रदेश

३) ज्युपिटर डिस्टीलरी, दमण

४) खेमाणी डिस्टीलरी, दमण

५) रॉयल डिस्टीलरी, दमण

६) क्रिपी डिस्टीलरी, दमण

७) बिर्लाई डिस्टीलरी, गोवा

८) नॅशनल डिस्टीलरी, गोवा

९) ननोरा डिस्टीलरी, गोवा

४. उपरोक्त प्रमाणे मळी निर्यातीची परवानगी देण्यापूर्वी योग्य ती सखोल चौकशी करून मळी निर्यातीचे परवानगी देण्यात यावी.

( ए. रामकृष्णन )
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति

१. सर्व जिल्हाधिकारी
२. या विभागातील सर्व राजपत्रित अधिकारी
३. सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क
४. या कार्यालयातील सर्व कार्यासने
५. अभिलेख शाखा ५ प्रती

Export Mali